**विधान भवन**
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

सत्यमेव जयते

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ७८४/म.वि.स./ ग-१
दिनांक 09 JAN 2020

प्रेषक

सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

**दोन्ही सभागृहांचे सर्व सन्मा.सदस्य.**

विषय : **मुंबई आमदार निवास कक्ष वितरणाबाबत ..**

**आदरणीय महोदय/महोदया,**

दोन्ही सभागृहाच्या सर्व सन्मा.सदस्यांस निदेशानुसार कळविण्यात येते की, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सन्मा.सदस्यांना आकाशवाणी व विस्तारीत आमदार निवास येथे कक्ष वितरण या विषयाच्या अनुषंगाने मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.संसदीय कार्य मंत्री त्याचप्रमाणे सर्व पक्षाच्या गटनेत्यांसोबत दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी बैठक घेण्यात आली. महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषद या दोन्ही सभागृहांचे मिळून ३६६ आमदार आहेत. त्यापैकी २०८ सन्मा.सदस्यांना आकाशवाणी व विस्तारीत आमदार निवास येथे कक्ष वितरीत करण्यात आलेले आहेत व सद्य:स्थितीत आता आकाशवाणी व विस्तारीत आमदार निवास येथे वितरणासाठी कक्ष उपलब्ध नाहीत. उक्त २०८ सन्मा.सदस्य वगळता उर्वरित १५८ सदस्यांना एकही कक्ष प्राप्त झालेला नाही. या १५८ सदस्यांपैकी ९७ सन्मा.सदस्य हे मुंबई व मुंबई उपनगर परिसरापासून ३०० कि.मी. व त्यापेक्षा जास्त अंतरावर वास्तव्य करीत असल्याने प्रथम त्यांना कक्ष उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मा.पिठासीन अधिकारी यांनी मा.सदस्यांच्या निवासाची पर्यायी व्यवस्था म्हणून घाटकोपर, मुंबई येथील शासकीय निवासस्थानांची दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी पहाणी केली असून सन्मा.सदस्यांकरीता घाटकोपर, मुंबई येथे १४० कक्ष उपलब्ध होवू शकतील. त्यानुसार दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(१) मा.मंत्री महोदयांच्या ताब्यातील कक्ष रिक्त करुन देण्याबाबत विनंती करण्यात यावी व मा.मंत्री महोदयांचे रिक्त होणारे कक्ष प्राथम्याने सन्मा.महिला सदस्य व त्यानंतर ज्येष्ठ सन्मा.सदस्य या क्रमाने वितरीत करण्यात यावेत.

(२) जे सन्मा.सदस्य मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, वसई-विरार, पनवेल, कल्याण-अंबरनाथ या परिसरातील आहेत त्यांना घाटकोपर, मुंबई येथे कक्ष देण्यात येवू नये व त्यांना मासिक रुपये १,००,०००/- भत्ता देण्यात यावा.

.. २/-



विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०३२.
विधानमंडळ दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२ ७३ ९९/२२०२ ६३ ५४/२२०२ ६८ ७९/२२०२ ७७ ७५/७७ * फॅक्स क्रमांक : ०२२-२२०२ ४५ २४/२२८२ ०८ २०
ई-मेल (E-mail) : mls_mumbai@rediffmail.com * संकेत स्थळ (Website) : www.mls.org.in

(३) घाटकोपर, मुंबई येथील कक्ष मुंबई व मुंबई उपनगर परिसरापासून ३०० कि.मी. व त्यापेक्षा जास्त अंतरावर असलेल्या उक्त ९७ सदस्यांना प्रत्येकी एक कक्ष याप्रमाणे वितरीत करण्यात यावेत, असे करताना सन्मा.सदस्यांना खालीलप्रमाणे पर्यायांबाबत विचारणा करुन लेखी स्वरुपात मागणी करण्याबाबत कळविण्यात यावे.

(अ) ज्या सन्मा.सदस्यांना घाटकोपर, मुंबई येथील कक्ष उपलब्ध करुन हवा आहे त्यांनी त्यांची मागणी दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजीपर्यंत लेखी स्वरुपात श्री.रविंद्र जगदाळे, अवर सचिव, कक्ष क्रमांक १३०१, तेरावा मजला, विधान भवन, मुंबई येथे दयावी.

(ब) ज्या सन्मा.सदस्यांची कक्षाऐवजी मासिक रुपये १,००,०००/- ची मागणी आहे. अशा सन्मा.सदस्यांनी देखील तशी मागणी लेखी स्वरुपात दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजीपर्यंत श्री.रविंद्र जगदाळे, अवर सचिव, कक्ष क्रमांक १३०१, तेरावा मजला, विधान भवन, मुंबई येथे दयावी.

(४) तसेच, सन्मा.सदस्यांना घाटकोपर, मुंबई येथे भेट दयावयाची असल्यास त्यांनी खालील नमूद अधिकारी व पत्त्यावर संपर्क करावा.

अधिकाऱ्याचे नाव- श्री.जमिर पठाण, कनिष्ठ अभियंता, सा.बां.विभाग, मुंबई.
भ्रमणध्वनी क्रमांक-७०२०९०७८४८

पत्ता- **घाटकोपर सरकारी कर्मचारी वसाहत, इमारत क्रमांक-४,
रेअर टाऊन शिप प्रा.लि., सिटीएस क्रमांक-१९४बी,
पीडब्ल्यूडी मैदान, घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड,
छेडानगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०८९.**

**भेट देण्याची वेळ : सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**

तसेच, असे देखील कळविण्यात येते की, घाटकोपर, मुंबई येथील उपलब्ध होणारे कक्ष हे येत्या दोन महिन्यात टप्प्या-टप्प्याने उपलब्ध होणार असून त्यानूसार ते वितरीत करण्यात येतील.

घाटकोपर, मुंबई येथे उपलब्ध करुन देण्यात येणारी सुविधा ही मनोरा आमदार निवासाचे बांधकाम होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात सर्व सन्मा.सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात येणार असून सर्व सन्मा.सदस्यांनी सहकार्य करावे, अशी विनंती करण्यात येत आहे.

आपला,

**(राजेंद्र भागवत)**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रत -

(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
(२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
(३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी, विधान भवन, मुंबई.

.. ३/-

याची प्रत माहितीसाठी -

(१) मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, सर्व मा.मंत्री, सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

(२) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

(३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

(४) सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

(५) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

(६) मुख्य अभियंता, मुंबई प्रादेशिक विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, २५, मर्झबान स्ट्रीट, मुंबई

(७) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, २५, मर्झबान रोड, मुंबई.

(८) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, दुसरा मजला, २५, मर्झबान रोड, मुंबई.


(९) कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई नौरोजी मार्ग, अंधेरी (पश्चिम),मुंबई.

(१०) अधीक्षक, आमदार निवास, बांधकाम भवन, मुंबई.

(११) व्यवस्थापक, आकाशवाणी, जुने विधान भवन आमदार निवास, मुंबई.

(१२) विधान भवनातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई


Google Maps **Maharashtra Vidhan Bhavan to Akruti Rising City, Mumbai, Maharashtra** Drive 21.3 km, 39 min




Map data ©2020 200 m

Google Maps Maharashtra Vidhan Bhavan to Akruti Rising City, Mumbai, Maharashtra

Drive 21.3 km, 39 min




Map data ©2020 2 km